महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष : – १ ले    अंक :– ०३    बुधवार दि. ६ नोव्हेंबर २०२४ पान :– ४ किंमत ५ रु.    जळगाव

## हिना गावितांची भाजपला सोडचिठ्ठी

### नंदुरबारच्या राजकारणात खळबळ : अक्कलकुवा मतदारसंघामुळे वाद

नंदुरबार–राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्ता तथा माजी खासदार डॉ. हीना गावित यांनी भाजपला रामराम केला आहे. गावित यांनी पक्षाकडे राजीनामा पाठवला आहे. अक्कलकुवा मतदारसंघात बंडखोरी करत गावित यांनी अपक्ष उमेदवाराचा अर्ज भरला होता. त्यादरम्यान, आता हीना गावित यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिलेली आहे. अक्कलकुवा विधानसभेसाठी शिंदे शिवसेनाकडून विधान परिषदेचे आमदार आमश्या पाडवी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पण गावित यांनी या मतदारसंघात आपली भूमिका मांडत



पक्षाला राजीनामा दिलेला आहे.

शिंदे गटाच्या विरोधी भूमिकेमुळे अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. शिंदे गटाचे नेते काँग्रेसचा प्रचार करत आहेत. महायुतीबाबत शिंदे गटाची गद्दारी असल्याने भाजपचा राजीनामा दिला आहे. अक्कलकुवा मतदारसंघाला विकासाच्या बाबातीत नंबर वन करणार. महायुतीत निष्ठा आम्हीच पाळायची का? माझ्यामुळे पक्ष आणि देवेंद्र फडणवीस यांना अडचण होऊ नये म्हणून पक्षाचा आणि पदाचा राजीनामा देत आहे, असे म्हणत हीना गावित यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे.

दरम्यान, माजी खासदार डॉ. हीना गावित याही अक्कलकुवा या मतदारसंघासाठी इच्छुक असल्याने त्यांनी वरिष्ठांना गळ घातली होती. वरिष्ठांनी त्यांना प्रतिसाद देत ही जागा भाजपाला मिळावी यासाठी वरिष्ठ स्तरावर बोलणी सुरू केली. पण अखेर ही जागा शिंदेच्या शिवसेनेला सुटली आणि हिना गावित यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला. आता युतीतच बंडखोरी झाली. हीना गावित यांनी अपक्ष उमेदवारीचा अर्ज भरला आणि तालुक्यात मतांची विभागणी होऊ शकते शिंदेंना याचा फटका बसू शकतो. कारण नंदुरबार मतदारसंघात गावित घराण्याचा आधीपासून दबदबा राहिलेला आहे. त्यामुळे हीना गावित आता क्शन मोडवर आलेल्या आहेत. त्यामुळे अक्कलकुवा मतदारसंघात कांटे की टक्कर होणार हे मात्र नक्की आहे.

## राज्याच्या प्रगतीला गती देणारे सरकार हवे : भाजप

पुणे : आगामी विधानसभा निवडणूक ही महाराष्ट्राच्या भविष्याची वाटचाल निश्चित करण्यासाठी निर्णायक ठरणार असून राज्याच्या विकासाला स्थगिती देणारे सरकार हवे की प्रगतीला गती देणारे सरकार सत्तेवर हवे याचा निर्णय मतदारांना करावयाचा आहे. मतदार महायुतीला कौल देऊन प्रगतीच्या बाजूने मतदान करतील असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर असताना राज्याच्या प्रगतीला खीळ बसली, आणि सर्वच क्षेत्रांत राज्याची पीछेहाट झाली. मुंबईतील आरे–कुलाबा मेट्रो प्रकल्पाचे काम निम्म्याहून अधिक पूर्ण झालेले असताना हा प्रकल्प थांबविल्यामुळे महाविकास आघाडी सरकारने राज्याचे १४ हजार कोटींचे नुकसान केल्याचे स्पष्ट झाले, अन्य अनेक जनहिताचे प्रकल्प रोखल्याने शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि गरीब जनता सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहिली. मुंबईचा किनारी मार्ग, अटल सेतू, मेट्रो, नवे विमानतळ, झोपडपट्टी योजना, अशा अनेक सुविधा महायुती सरकारने पुढे राबविल्या आणि बिघडलेला महाराष्ट्राचा मार्ग रुळावर आणला असे ते म्हणाले..

समृद्धी महामार्गास महाविकास आघाडीने विरोध केला होता, मराठवाडा वॉटरग्रीड योनजेतून मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीच्या प्रयत्नांनाही तत्कालीन सरकारने खीळ घातली. अडीच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या सरकारने केलेल्या जनहिताच्या आणि राज्यहिताच्या एका तरी कामाचा दाखला द्यावा, असे आव्हान भांडारी यांनी दिले.

## यंदा बंडखोर ठरविणार सरकारचे भविष्य!

मुंबई : १९९५ च्या विधानसभा निवडणुकीसारखी स्थिती आताच्या विधानसभा निवडणुकीत दिसत आहे. राजकीय पक्षांमध्ये उमेदवारी न दिल्याने मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत यंदा तब्बल सहा प्रमुख पक्ष उतरले आहेत. तसेच तिसरी आघाडी आणि ठिकठिकाणी अपक्ष आहेत. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीप्रमाणे ३५ अपक्ष आमदार निवडून आले, तर यंदा राज्य सरकारचे चित्र बदलू शकते.

दरम्यान, ४ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज घेण्याचा शेवटचा दिवस होता. बंडखोरांचे बंड शमविण्याचा दिवस होता. महायुती आणि महाविकास आघाडीला बंडखोरांचे बंड थंड करण्यात काही ठिकाणी यश आले तर काही ठिकाणी अपयश आले आहे. आताच्या बंडखोरांची स्थिती पाहता, १९९५ च्या विधानसभा निवडणुकीची पुनरावृत्ती होईल अशी जोरदार चर्चा सध्या राज्यात रंगली आहे.

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीसारखी स्थिती आताच्या विधानसभा निवडणुकीत दिसत आहे. राजकीय पक्षांमध्ये उमेदवारी न दिल्याने मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत यंदा तब्बल सहा प्रमुख पक्ष उतरले आहेत. तसेच तिसरी आघाडी आणि ठिकठिकाणी अपक्ष आहेत. एकूणच यंदाची निवडणूक उमेदवारांच्या अंगाने ख–या अर्थाने बहुरंगी लढतींची बनली आहे. बंडखोरीमुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकालही बदलू शकतो.

**बहुमतापासून रोखणार?**

महाविकास आघाडी आणि महायुतीला बहुमतापासून रोखू शकतो. शिवाय, ४० च्या आसपास अपक्ष आमदार जिंकून आल्याने १९९५च्या निवडणुकीची पुनरावृत्ती होऊ शकते. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीप्रमाणे ४० ते ४५ अपक्ष आमदार निवडून आले, तर यंदा राज्य सरकारचे चित्र बदलू शकते.

## खळबळजनक, अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांच्यावर गोळीबार, प्रचार रॅली दरम्यान घडली घटना

बोदवड (प्रतिनिधी) :– मुक्ताईनगर–बोदवड मतदार संघातील अपक्ष उमेदवार विनोद सोनवणे यांचा बोदवड तालुक्यातील राजूर गावात प्रचार रॅली सुरू असतांना कारमधून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची खळबळजनक घटना आज मंगळवारी दुपारी घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून बोदवड पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत.

बोदवड मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत अपक्ष म्हणून विनोद सोनवणे हे निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहे.(केसीएन)दरम्यान, मंगळवारी



५ नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह बोदवड तालुक्यातील शिरसाळा येथील जागृती मारोती मंदीरात जावून प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराला सुरूवात केली आहे. त्यानंतर त्यांचा प्रचार दौरा बोदवड तालुक्यात सुरू झाला.

बोदवड तालुक्यातील राजूर गावाजवळ दुपारी ३ वाजेच्या सुमारास विनोद सोनवणे यांची प्रचार रॅली जात असतांना बिना नंबरची मोटारसायकलवरून आलेल्या तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. यामध्ये ते थोडक्यात बचावले आहेत.

कार्यकर्त्यांमध्ये यावेळी पळापळ झाली. या घटनेमुळे बोदवड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या गोळीबारमध्ये कुणालाही दुखापत झालेली नाही. बोदवड पोलीस घटनास्थळी पोहोचले असून तपास करीत आहे. सदर सर्व कार्यकर्ते हे बोदवड पोलीस स्टेशनला पोहोचले आहे.

## ‘लाडक्या बहिणीं’साठी तुमचा हा भाऊ १० वेळा जेलमध्ये जायला तयार पण’, एकनाथ शिंदे काय म्हणाले?

मुंबई– यंदा विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकासआघाडी आमने–सामने दिसणार आहे. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात प्रचाराचा धुराळा सुरु झाला असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या महायुतीतील उमेदवारांच्या प्रचारात व्यस्त आहे. नुकतंच त्यांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार आणि शिंदे गटाचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांची प्रचारसभा घेतली.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात प्रचारसभांची रणधुमाळी सुरु झाल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कल्याण येथील शिंदे गटाचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार आणि शिंदे गटाचे उमेदवार विश्वनाथ भोईर यांची प्रचारसभा पार पडली. यापूर्वी विश्वनाथ भोईर यांच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी एकनाथ शिंदेंनी छोटेखानी भाषण करत महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला. ‘कार्यालयाच्या उद्घाटनाला इतके लोक असतील तर प्रचाराला किती असतील, याचा तुम्ही विचार करा. समोरच्याचे डिपॉझिट नक्कीच जप्त होणार आहे’, असा विश्वास व्यक्त केला. तर यावेळी ‘लाडकी बहीण’ योजनांचा उल्लेख करत विरोधकांवर टीकास्त्र डागलं. शिंदे उपस्थित महिला वर्गाला बघून म्हणाले, लाडक्या बहिणी इथे आहेत, आता त्यांना भाऊबीज दरवर्षी नाही तर दर महिन्याला मिळणार आहे. विरोधक सतत लाडकी बहीण योजना बंद करण्याच्या मागे लागले आहेत. विरोधी पक्षांनी लाडकी बहीण योजना बंद करण्याचा प्रयत्नही केला आहे. ते सतत मला जेलमध्ये टाकायच्या मागे लागले आहेत. या लाडक्या बहिणींसाठी मी एक वेळा नाही तर दहावेळा जेलमध्ये जायला तयार आहे, असं म्हणालेत.



## यूपीत मिग–२९ विमान कोसळले

नवी दिल्ली : मिग २९ कोसळल्यानंतर जमिनीवर पडताच विमानाने पेट घेतला. यावेळी विमानातून पायलटसह दोन लोकांनी विमानातून बाहेर उडी घेतली. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले आहेत. विमान ज्या ठिकाणी कोसळले, त्या ठिकाणापासून दोन किमी अतंरावर पायलट आणि त्याचे सहकारी आढळून आले. कागारौल गावाच्या सोनिगा गावाजवळ मोकळ्या शेतात हे विमान कोसळले. त्यानंतर या विमानाने पेट घेतला. त्यामुळे हे विमान जळून खाक झाले.

भारतीय हवाई दलाचे लढाऊ विमान मिग २९ उत्तर प्रदेशातील आग्राजवळ सोमवारी कोसळले. संरक्षण अधिका–यांनी सांगितले की, पंजाबमधील आदमपूर येथून या विमानाने उड्डाण केले होते आणि ही घटना घडली, तेव्हा ते एका सरावासाठी आग्राला जात होते. त्यावेळी ही दुर्घटना घडली. या प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

घटनेची माहिती मिळताच प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणांचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक पोलिसही घटनास्थळी पोहोचले. विमान शेतात कोसळताना पाहून गावातील लोकही घटनास्थळी पोहोचले. या दुर्घटनेचे कारण समजू शकले नाही. त्यामुळे या दुर्घटनेनंतर तातडीने चौकशीचे आदेश देण्यात आले. तसेच दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी संबंधित विभागाला सतर्क करण्यात आले आहे.



## माणसात देव पाहणारा देव माणूस प्रा. चंद्रकांत सोनवणे

एखाद्या दगडाला शेंदूर लावून त्याला देवाचा दर्जा प्राप्त होत नाही.तर माणसाच्या निर्मळ व प्रेमळ मनात देवाचा वास असतो.आणि ज्याने माणसात देव जाणिला त्याला देवमाणूस म्हणतात.असाच माणसात देव पाहणारा देवमाणूस म्हणजे माजी आमदार प्रा.चंद्रकांत बळीराम सोनवणे उर्फ आण्णा होय.

प्रा.चंद्रकांत सोनवणे यांना देवमाणसाची उपमा देण्याचे प्रयोजन यासाठी आहे की,गेली अनेक वर्ष तालुक्यातील आदिवासी,सर्वसामान्य नागरिक,मतदार हा मूलभूत गरजा पासून कोसो दूर राहिला.ना रस्ते,ना वीज,ना पाणी,ना कसल्या आरोग्याच्या सुखं सोयी प्रचंड अशा वेदनादायी विचारांचे ओझे आपल्या मनात ठेवून कुठलाही हुंकार न देता संघर्षाचे जीवन व्यतित करीत राहिला. मात्र त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी या दुर्लक्षित मतदाराकडे वळून देखील पाहिले नाही हा चोपडा विधानसभा मतदार संघाचा इतिहास आहे.

मात्र आज चोपडा विधानसभा मतदार संघाच्या चोहो बाजूस विकासाची गंगा वर्तुळाकार वलयाने व्यापलेली दिसते. सर्वसामान्य माणसाच्या मनातल्या वेदना अलगदपणे दूर करीत विकास जर का सत्यात उतरलेला दिसतो तर प्रा.चंद्रकांत सोनवणे हे देवमाणूस या उपाधीला निश्चितपणे पात्र ठरतात असे माझे वैयक्तिक मत आहे.आणि हेच वास्तव आहे असे नागरिक देखील बोलून दाखवितात. त्यांचे कामे बोलतात.आणि या विकासाचा साक्षीदार संपुर्ण मतदार संघ आहे.विरोधकांसाठी तर हा चिंतनाचाच विषय म्हणावा लागेल.कारण गेली अनेक वर्ष न झालेला विकास नावाचा महापुरुष अचानक नऊ वर्षात आला कसा ? या प्रश्नाचे त्यांनी उत्तर शोधावे कारण प्रचारा दरम्यान मतदार राजा जनरल नॉलेज म्हणून हा प्रश्न त्यांना जरूर विचारेल. त्यासाठी अभ्यासपूर्ण प्रचाराला सामोरे जावे असे वाटते.



**सडेतोड**
**नंदलाल मराठे**

निवडणुका तोंडावर आल्या की,अनेक हौशे नवशांचे खादीचे कपडे टेलरकडे टाकले जातात.त्यावेळी सर्वच इच्छुकांना आमदार झाल्यासारखे वाटतं.आणि त्यांना वाटणं देखील साहजिक आहे. कारण काही बुरसटलेल्या विचारांचे स्वयंघोषित लेखणी बहाद्दर आपल्या खिशातील लेखणी त्या बिन बुंद्याच्या पुढाऱ्यांच्या चरणावर ठेवतात.अर्थात तो ज्या पद्धतीने सांगेल तसे हे पतरवाडीकार त्या तमाशा फळातील सोंगाड्याचे (नौटंकीकार) पेड रकाने भरतात. त्यामुळे त्याचा हवेचा फुगा होतो.आणि तिकीट न मिळाल्याने तो फुटतो देखील.

वास्तवता अख्ख्या तालुक्याला माहिती आहे.प्रा.चंद्रकांत सोनवणे जेव्हा आमदार झाले तेव्हा पासून ते त्यांच्या अर्धांगिनी सौ. लताताई सोनवणे आमदार असे पर्यंत किती विकास झाला हे प्रत्यक्षात दिसते.कधी नव्हे इतका निधी सोनवणे परिवारातील दोन्ही आमदारांनी चोपडा विधानसभा मतदार संघात आणला. आणि हो,त्यांच्याकडे फक्त आमदार पद आहे. मंत्रीपद असते तर काय कायापालट झाला असता याची तूर्तास कल्पना न करणेच योग्य.

काही नेत्यांनी गाढ झोपेतून उठवित कुंभकर्णी नेतृत्वाला बडेजाव दिला.मात्र या टेलररुपी हुशार जनतेने प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनाच खादी रुपी कपड्यांचे योग्य माप मतदानाच्या माध्यमातून यापूर्वी दिले आहे. आणि आता ही देईल अशी आजची परिस्थिती आहे.कारण प्रा.चंद्रकांत सोनवणे यांना विकास पुरुषाची मान्यता आता मतदारांनीच बहाल केली आहे.

संवेदनशील समजल्या जाणाऱ्या चोपडा तालुक्यात सोनवणे कुटुंबाच्या माध्यमातून शिवसेना पक्षाची ही दुसरी टर्म आहे महाराष्ट्रात सर्वप्रथम (पाच दिवसांचे) चोपडा शहरातील गणपतीचे विसर्जन होते मात्र गेली आठ, नऊ वर्षांपासून येथील गणेश विसर्जन मिरवणुकीला कुठल्याही प्रकाराचे गालबोट लागलेले नाही याची जमेची बाजू म्हणजे प्राध्यापक चंद्रकांत सोनवणे व आमदार लताताई सोनवणे यांचा सर्व जाती धर्मातील लोकांशी असलेला जातीय सलोखा होय.

महिला आमदार असूनही सौ. लताताई सोनवणे या प्रशासनातील अधिकाऱ्यांशी समन्वय साधत गणेश भक्तांच्या स्वागतासाठी त्या शहरातील संवेदनशील समजल्या जाणाऱ्या आझाद चौकात सज्ज असतात म्हणून गणेश भक्तांच्या काळजीवाहू आमदार म्हणून त्यांच्याकडे कुतूहलाने बघितले जाते. मग निवडणूकीत कसा असेल आम्हाला आमदाराचा दुसरा पर्याय? आमदारकीच्या शर्यतीत बळजबरीने उतरविण्यापेक्षा चमक,दमक, धमक असणारे व माणसात देव पाहणारे मा.आ.चंद्रकांत सोनवणे यांचेच नेतृत्व चोपडा तालुक्याच्या विकासासाठी लाभदायी ठरेल असेच चित्र आज तरी चोपडा विधानसभा मतदार संघामध्ये दिसत आहे.

## संपादकीय

# निर्णायक दिवस

दिवाळीच्या चार दिवसांच्या सणानंतर आता पुन्हा महाराष्ट्रातील राजकीय वातावरण आणि निवडणुकांच्या संबंधातील निर्णय यावर सगळ्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे. आजचा दिवस महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी खूप निर्णायक दिवस ठरला. आज दिवसभरात दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. यातील सकाळची पहिली घडामोड म्हणजे, मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे आणि दुसरा तितकाच महत्त्वाचा निर्णय म्हणजे, निवडणूक आयोगाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तातडीने बदली केली आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या राजकारणाच्या दृष्टीने या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या घटना आहेत.

मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या संबंधात खूप आधीपासूनच वातावरण तापवले होते. आपले स्वतंत्र उमेदवार उभे करण्याच्या संदर्भात त्यांनी हालचाली चालू केल्या होत्या. त्यांच्यातर्फे उभे केले जाणारे उमेदवार कोणाला राजकीयदृष्ट्या लाभाचे किंवा अडचणीचे ठरणार याची गणिते मांडली जात होती. त्याचबरोबर या निर्णयामुळे मनोज जरांगे यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील नेमकी ताकद किंवा प्रभाव जोखला जाणार होता. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला आपसूकच राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. जरांगे यांनी त्या अनुषंगाने नियोजनबद्ध हालचाली केल्याचेही जाणवले. त्यांनी इच्छुकांचे अर्ज मागवून घेतले, त्यांच्यापैकी काहींच्या मुलाखती पण घेतल्या. त्यानंतर स्ट्रॅटेजीकली उमेदवार उभे करण्याचा निर्णय घोषित केला. या सगळ्या घडामोडी पाहता ते निवडणुकीच्या रिंगणात उतरणारच हे जवळपास निश्चित झालेले असताना त्यांनी अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. या निर्णयाचे दोन अन्वयार्थ निघतात. त्यातील पहिला अन्वयार्थ असा की, जरांगे यांचा हा निर्णय महाविकास आघाडीसाठी लाभदायक आणि महायुतीसाठी धोकादायक ठरू शकतो. दुसरा अन्वयार्थ असा की, त्यांनी आता निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याने जरांगे यांची झाकली मूठ तशीच राहणार आहे. अन्यथा त्यांनी जर निवडणुकीच्या रिंगणात खरंच उडी घेतली असती आणि त्यात जर त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नसते, तर त्यांचा जो एकूण प्रभाव महाराष्ट्रभर दिसत होता, त्याला ओहोटी लागली असती. त्यामुळे त्यांचा माघारीचा निर्णय चाणाक्षपणाचाच ठरला आहे असे म्हणता येईल. आज जरांगे यांनी जे निवेदन केले आहे, त्यातील एक वाक्य महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या समर्थकांना आवाहन केले आहे की, 'निवडणुकीत कोणाचाही पुरस्कार करू नका किंवा कोणालाही पाठिंबा देऊ नका. १०:१२ –च्, ११/५/२०२४ ठर्ीळपवीर झरींळश्र: गुपचूप मतदान करून आपल्याला जे पाडायचे आहेत त्यांना पराभूत करा'. त्यांच्या आवाहनाचा योग्य संदेश त्यांच्या समर्थकांपर्यंत गेला असून त्यातून आता महायुतीला विशेषतः भाजपला आव्हानात्मक स्थिती निर्माण होणार आहे हे मात्र नक्की. कारण त्यांचा सुरुवातीपासूनचा राग केवळ फडणवीस आणि भाजप यांच्यावरच होता आणि त्यांना पराभूत करण्याची भाषा त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली होती. भारतीय जनता पक्षासाठी आज दुसरा धक्कादायक निर्णय ठरला तो म्हणजे निवडणूक आयोगाने केलेली पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली. रश्मी शुक्ला या केवळ भाजपसाठीच काम करीत असल्याचा काँग्रेस नेते नाना पटोले आणि अन्य नेत्यांचा स्पष्ट आरोप आहे. रश्मी शुक्ला या सेवेतून अधिकृतपणे निवृत्त झालेल्या असताना त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली गेली. ही मुदतवाढच बेकायदेशीर होती असे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. तरीही महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका लक्षात घेऊन त्यांना पोलीस महासंचालक पदावर नेमले गेले आणि त्यांच्या अखत्यारितच या निवडणुका घेऊन निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा भाजप आणि महायुतीचा प्रयत्न होता, या प्रयत्नाला निवडणूक आयोगाच्या आदेशामुळे खीळ बसली आहे. झारखंडमध्ये 'इंडिया आघाडी'चे सरकार आहे. तेथे भाजप विरोधात आहे, त्या राज्यातही सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे झारखंडच्या पोलीस महासंचालकांना बदलण्याची मागणी भारतीय जनता पक्षाने केल्यानंतर निवडणूक आयोगाने तेथील पोलीस महासंचालकांची त्वरित बदली केली परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडून निवडणूक आयोगाकडे रश्मी शुक्ला यांची बदली करण्याची लेखी मागणी करूनही त्यावर अजून निर्णय होत नव्हता. आज अखेर निवडणूक आयोगाने तो निर्णय घेऊन टाकला. या निर्णयाचे काँग्रेस नेत्यांनी स्वागत केले असले तरी शुक्ला यांना हटवण्यासाठी इतका वेळ का लागला याची माहिती त्यांना हवी आहे. तसेच रश्मी शुक्ला यांना केवळ पोलीस महासंचालक पदावरून हटवणे पुरेसे नाही, तर त्यांना पोलीस सेवेतूनच कायमची सुट्टी द्यावी अशीही काँग्रेसची मागणी आहे. त्याचबरोबर रश्मी शुक्ला यांच्याकडे निवडणुकीशी संबंधित कोणताही कार्यभार सोपवला जाऊ नये अशी आग्रही मागणी आता प्रदेश काँग्रेसने लावून धरली आहे. आजचे हे दोन्ही निर्णय महायुतीसाठी अडचणीचे ठरले आहेत असा निष्कर्ष निघतो. रश्मी शुक्ला यांच्यामार्फत प्रशासकीय यंत्रणेवर दबाव ठेवण्याचा सत्ताधार्यांचा जो प्रयत्न होता त्याला खीळ बसली आहे असे विरोधकांचे म्हणणे आहे, त्यात बर्यापैकी तथ्य आहे. मुळात रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधी पक्ष नेत्यांच्या फोन टॅपिंगचा आरोप होता आणि उद्धव ठाकरे सरकारच्या काळात रश्मी शुक्ला यांच्याविरोधात त्या अनुषंगाने गुन्हाही दाखल झाला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर विरोधकांचा मांडला जाणारा मुद्दा सहज लक्षात येऊ शकतो. उशिरा का होईना निवडणूक आयोगाने लोकांच्या मनात संभ्रम शिल्लक राहणार नाही असा निर्णय घेत रश्मी शुक्ला यांना हटवले आहे, तो निर्णय लोकशाही प्रक्रियेला अनुकूल असाच म्हणावा लागेल, त्यामुळे या निर्णयाचे स्वागत करणे उचित ठरते.

# महिलेवर बलात्कार, सहा जणींचा विनयभंग अंबड, सातपूर, देवळाली कॅम्प, सरकारवाडा ठाण्यांत गुन्हे दाखल

नाशिक : शहरात महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनांत वाढ झाली आहे. यात दिवाळीच्या धामधुमीत एका महिलेवर पतीच्या मोठ्या भावाने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली असून, वेगवेगळ्या भागांत राहणाऱ्या सहा जणींच्या विनयभंगप्रकरणी अंबड, सातपूर, देवळाली कॅम्प व सरकारवाडा पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे यातील तीन प्रकार सिडको भागात घडले असून, पीडितांमध्ये एका अल्पवयीन मुलीचाही समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बलात्काराचा प्रकार लेखानगर भागात घडला. इंदिरानगर झोपडपट्टीत राहणाऱ्या पीडितेने याबाबत फिर्याद दिली आहे. महिला शनिवारी (दि.२) रात्री आपल्या घरात एकटी असताना ही घटना घडली. लहान भाऊ कामावर गेल्याची संधी साधत शेजारी राहणाऱ्या तिच्या पतीच्या मोठ्या भावाने घरात घुसून महिलेवर बलात्कार केला. सकाळी कामावरून परतलेल्या पतीस महिलेने आपबिती कथन केल्याने हा प्रकार पोलिसांत पोहोचला असून, अधिक तपास उपनिरीक्षक नितीन फुलपगारे करीत आहेत.

दुसरा प्रकार खुटवडनगर येथील जनकनगरी भागात घडला. पीडिता गेल्या २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास आपल्या घरात असताना संशयित सुरेश दलोड व त्याचे दोन साथीदार महिलेच्या घरी आले. इंदिरानगर पोलीस ठाण्यात दिलेली तक्रार मागे घ्यावी, या कारणातून संशयितांनी कुरापत काढून पीडिता व तिच्या पतीस मारहाण केली. यावेळी संशयितांनी जिवे ठार मारण्याची धमकी देत पीडितेचा विनयभंग केला. याप्रकरणी अधिक तपास उपनिरीक्षक पाडवी करीत आहेत. तिसरी घटना अंबड औद्योगिक वसाहतीत घडली. चुंचाळे शिवारातील घरकुल भागात महिला वर्ग शनिवारी (दि.२) सायंकाळच्या सुमारास आपापल्या घरासमोर रांगोळी काढत असताना ज्ञानेश्वर पवार (वय ३५) या संशयिताने जवळ जाऊन त्यांचा विनयभंग केला, तर एका मुलीस पैशांचे आमिष दाखवत त्याने विनयभंग केला. याबाबत मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. अधिक तपास सहायक निरीक्षक मुगले करीत आहेत. या तिन्ही घटनांप्रकरणी पाचवी घटना त्र्यंबक रोडवरील एका हॉटेलमध्ये घडली. पीडितेने अंबड पोलीस ठाण्यात बलात्कार, विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण (पोस्को) कायद्यान्वये वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चौथी घटना मेन रोड भागात घडली. पीडिता व तिचा पती शुक्रवारी (दि.१) दिवाळीच्या खरेदीसाठी मेन रोड परिसरातील भगवंतराव मिठाईवाले शेजारील विशाल बाजार या दुकानात गेले होते. पीडित दाम्पत्य खरेदी केलेल्या वस्तूंचे बिल अदा करून दुकानाबाहेर पडत असताना ही घटना घडली. संशयित शोएब शरिफ कुरेशी (वय २३, रा. दूध बाजाराजवळ) या परप्रांतीय कामगाराने दाम्पत्यास पुन्हा दुकानात बोलावून घेत, चोरीच्या संशयातून महिलेची पर्स चेक केली. यामुळे झालेल्या वादात संशयिताने दाम्पत्यास बेदम मारहाण करीत भरबाजारात महिलेचा विनयभंग केला. याबाबत सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संशयितास पोलिसांनी अटक केली आहे. अधिक तपास हवालदार बागूल करीत आहेत.

तर सहावी घटना देवळाली कॅम्प भागात घडली. रस्त्याने पायी जाणाऱ्या मैत्रिणींपैकी एकीचा दुचाकीवर आलेल्या अज्ञात भामट्याने विनयभंग केला. शनिवारी (दि.२) रात्री बालगृह रोडवरील तिरुपती होम्स या बंगल्यासमोर हा प्रकार घडला. फेरफटका मारणाऱ्या मैत्रिणींच्या पाठीमागून स्कूटीवर येवून भामट्याने हे कृत्य केले असून, याप्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास हवालदार जाधव करीत आहेत.

दिलेल्या फिर्यादीनुसार पीडिता तिचा पती, पतीचा मावसभाऊ आणि बहीण शनिवारी (दि. २) रात्री जेवण करण्यासाठी त्र्यंबक रोडवरील बीएलव्हीडी हॉटेल येथे गेले होते. या ठिकाणी एका अनोळखी तरुणाने महिलेस धक्का देत विनयभंग केल्याने ही घटना घडली. हा वाद विकोपाला गेल्याने संतप्त टोळक्याने महिलेच्या पतीसह दिरास शिवागाळ करीत लाथाबुक्यांनी मारहाण केली. याबाबत सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास उपनिरीक्षक न्हाळदे करीत आहेत.

# भुसावळ शहरातील वाल्मीक नगरात आग सिलिंडर बाहेर काढल्याने टळला अनर्थ

भुसावळ (५ नोव्हेंबर २०२४) : भुसावळ शहरातील वाल्मीक नगरात सोमवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास शॉर्ट सर्किटने अचानक आग लागल्याने मोठीच धावपळ झाली. माजी नगरसेवक निर्मल कोठारी आणि पालिकेच्या कर्मचार्यांनी घरातील दोन सिलेंडर मोठ्या धाडसाने बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला.



शहरातील वाल्मीक नगर भागात सोमवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास अमन बोयत यांच्या घरास शॉर्ट सर्किटमुळे आग लागली यामुळे वाल्मीक नगरात धावपळ उडाली. पालिकेच्या बंबास पाचारण करण्यात आले. बोयत यांच्या घरात दोन भरलेले सिलेंडर होते. यावेळी माजी नगरसेवक निर्मल कोठारी आणि पालिकेच्या कर्मचार्यांनी आग लागलेल्या घरात धाडस करीत शिरत दोन्ही सिलिंडर बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. आगीनंतर वाल्मिक नगरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी जमा झाली. पालिकेच्या तीन अग्निशमन बंबांनी आग आटोक्यात आणली. आगीत घरातील साहित्य जळल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले.

# सैन्य दलातील जवान यांना अमरस्वर पुस्तक प्रदान..



चोपडा( प्रतिनिधी)– तालुक्यातील आडगाव येथील सैन्य दलातील जवान जयेश भास्कर पाटील यांना कवी रमेश जे. पाटील यांनी लिहिलेले पाचवे पुस्तक देण्यात आले.

सैन्य दलात १९ वर्ष विशेषसेवा बजावल्यानंतर, जयेश भास्कर पाटील यांना कवी रमेश पाटील यांचे निवासस्थानी गौरविण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात सैन्य दलातील जवानांना हे पुस्तक अर्पण करण्यात आले आहे या भावनेतून जयेश पाटील यांना अमरस्व र काव्यसंग्रह देण्यात आला. यावेळी सूतगिरणी संचालिका, कमल पाटील याही उपस्थित होत्या.

# आदिवासी महिलेच्या धैर्यामुळे मुलांची सुटका अन बिबट्या बंदिस्त

नाशिक – बिबट्या समोर असतानाही भीतीने गाळण उडण्याऐवजी आदिवासी महिलेने घरातील आपल्या तीनही मुलांना सुखरुपपणे बाहेर काढून घराचा दरवाजा बंद करुन बिबट्यास घरातच बंद केले. सुरगाणा तालुक्यातील आदिवासी महिलेने दाखविलेल्या या धैर्याची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.

सुरगाणा तालुक्यातील आवळपाडा येथे दिवाळीची सर्वत्र लगबग सुरू होती. मातीचे दिवे लावून लक्ष्मीपूजन झाल्यानंतर रात्रीचे जेवण आटोपून कमलेश भोये हे ओसरीवर निवांतपणे टीव्ही पहात बसले होते. टीव्ही पाहण्यात सर्व मग्न असताना काही क्षणात त्यांचा कुत्रा बिबट्या मागे लागल्याने दरवाजातून पळत आला. घराचे पुढील आणि मागील दरवाजे समोरासमोर असल्याने कुत्र्याने मागील दरवाजातून पळ काढला. बिबट्याला बाहेर पडण्याचा अंदाज न आल्याने तो घरातील कोपऱ्यात अडकला. कोपऱ्यातून सुटका करुन घेण्यासाठी बिबट्याने शर्थीने प्रयत्न केले. कच्च्या विटांची भिंत असल्याने भिंत पोखरून बाहेर पडण्याचा प्रयत्नही केला. घरात जळणासाठी असलेले सरपणही अस्तव्यस्त झाले. साधारणपणे तासभर हे नाट्य घरात सुरु होते. हे सर्व होत असताना परिसरातील हिराबाई दळवी या महिलेने शांतपणे घरात अडकलेल्या तीन लहान मुलांना सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर दरवाजे बंद करून घेतले. या प्रकाराची माहिती पोलीस पाटील कमलेश महाले यांनी भ्रमणध्वनीने बाऱ्हे येथील वनपरिक्षेत्र अधिकारी एस. पी. कवर यांना दिली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ आवळपाडा गाठत रात्रभर बिबट्यावर पाळत ठेवली. नाशिक पश्चिमचे उपवनसंरक्षक सावर्डेकर, सहायक उपवनसंरक्षक कांबळे यांनी तातडीने दखल घेऊन वन्यजीव पथकास पाचारण केले.

# भुसावळात सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त दुचाकी रॅलीने वेधले लक्ष

भुसावळ : भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिन म्हणून शहरात साजरी करण्यात आली. येथील समस्त लेवा पाटीदार समाज परिवारातर्फे गुरुवारी सकाळी दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे ५०० महिला अन् पुरूषांनी सहभाग नोंदवला.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध भागातून सात मिरवणुका काढण्यात आल्या. सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त शहरातील नाहाटा कॉलेजजवळून गुरूवारी सकाळी ८ वाजता दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत सुमारे ५०० समाज बांधवांनी सहभाग घेतला. यात जवळपास २०० महिलांचा सहभाग होता. तर पु. ओं. नाहाटा कॉलेजपासून सुरू झालेली ही रॅली जामनेर रोडने अष्टभुजा देवी, पांडुरंग टॉकीज, बाजारपेठ पोलीस ठाण्यासमोरील बोगद्यातून हंबर्डीकर चौक, शहर पोलीस

ठाणे, गांधी पुतळा, तहसील कार्यालयावरून जळगाव रोडने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याजवळ आल्यानंतर रॅलीचा समारोप झाला. या रॅलीत सहभागी झालेल्या समाज बांधवांनी डोक्यात भगव्या टोप्या घातल्या होत्या.

# सराईत बॅटरी चोर अडकला पिंजऱ्यात

## भारतनगरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर पोलिसांचा सापळा

नाशिक : सोसायटीच्या

आवारातील लिफ्टच्या बॅकअपच्या बॅटऱ्या चोरणाऱ्या सराईतास पोलिसांनी अवघ्या काही तासात बेड्या ठोकल्या. छान हॉटेल ते भारतनगर दरम्यानच्या मार्गावर संशयिताच्या मुसक्या आवळण्यात आल्या असून त्याच्या ताब्यातून दुचाकीसह चोरीच्या बॅटऱ्या असा सुमारे ७५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई शहर गुन्हे शाखेच्या युनिट १ च्या पथकाने केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यश रविंद्र कापडणे (वय २४, रा. स्वामी निवास रो–हाऊस, सावतानगर, हिरावाडी) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. जनरल वैद्यनगर येथील पाटीदार भवन परिसरातील कृष्णा ग्रिस या सोसायटीच्या आवारातील लिफ्टच्या बॅटऱ्या चोरट्यांनी चोरून नेल्या होत्या. ही घटना शनिवारी (दि.२) रात्री घडली होती. याबाबत मनोज सोनवणे यांच्या फिर्यादीवरून दुसऱ्या दिवशी मुंबईनाका पोलीस

ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस चोरट्याचा माग काढत असतानाच युनिटचे कर्मचारी विशाल देवरे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. हॉटेल छान कडून भारतनगरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर एक तरूण चोरीच्या बॅटऱ्या



विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी सापळा लावला होता. एमएच १५ एफवाय ७९६१ या दुचाकीवर आलेल्या संशयिताच्या ताब्यात चोरीच्या बॅटऱ्या आढळून आल्या असून घटनेनतर अवघ्या काही तासात बेड्या ठोकत संशयिताच्या ताब्यातून सुमारे १५ हजारांच्या बॅटऱ्यांसह दुचाकी असा

७५ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

संशयित पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असून तो हाती लागल्याने अजून काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलीस सुत्रांनी वर्तविली आहे. मुद्देमालासह संशयितास मुंबईनाका पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले असून अधिक तपास हवालदार देविदास गाढवे करीत आहेत. ही कारवाई युनिटचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली हेमंत तोडकर, रविंद्र बागुल, प्रदिप म्हसदे, संदिप भांड, विलास देवरे, नाशिमखान पठाण, अमोल कोष्टी व जगेश्वर बोरसे आदींच्या पथकाने केली.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी–३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव–४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी * संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.)Email- dainikshauryamarathi@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक /सहमत असतीलच असे नाही (RNI-MAHMAR/2023/89125)

## नंदुरबार जिल्ह्यात एकूण ३१ उमेदवार रिंगणात; हीना गावितांची उमेदवारी लक्षवेधी

### नंदुरबार-शहाद्यात सरळ तर नवापुरात तिरंगी

नंदुरबार : विधानसभा निवडणुकीत माधारीनंतर जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून, नंदुरबार आणि शहादा मतदारसंघांत सरळ लढत रंगणार आहे. नवापुरात तिरंगी आणि अक्कलकुव्यात मात्र लक्षवेधी चौरंगी लढत रंगणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी माघारीच्या शेवटच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. विशेषतः शहादा-तळोदा मतदारसंघातील बंडखोरी महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरली होती. त्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात सोमवारी खास बंड शमविण्यासाठी जिल्ह्यात आले. त्यांनी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुहास नाईक यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर सुहास नाईक यांनी माघार घेतली. याशिवाय राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मोहन शेवाळे तसेच काँग्रेसच्या उमेदवारीसाठी स्पर्धेत असलेले झेलसिंग पावरा यांनीही अर्ज मागे घेतला. त्यामुळे याठिकाणी काँग्रेसमधील बंडखोरी शमली. या मतदारसंघात माघारीनंतर मतदारसंघातही महाविकास केवळ तीन उमेदवार रिंगणात असून, त्या भाजपचे राजेश पाडवी आणि काँग्रेसचे राजेंद्रकुमार गावीत यांच्यात मुख्य लढत रंगणार आहे. नंदुरबार विधानसभा आघाडीतच बंडखोरी होती. मात्र, आघाडीत उद्धवसेनेच्या नेत्यांनी रीना पाडवी यांची समजूत काढून त्यांचा अर्ज मागे घेतला. मात्र, राष्ट्रवादीचे (शरद पवार) रवींद्र वळवी यांनी आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्याने येथे त्यामुळे येथे निवडणुकीच्या रिंगणात




एकूण नऊ उमेदवार असले तरी खरी लढत भाजपचे उमेदवार आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावीत व काँग्रेसचे किरण तडवी यांच्यातच बंडखोरी झाली आहे. राहणार आहे. नवापुरात मात्र कायम आहे. याठिकाणी माघारीनंतर सुरुवातीपासून तिरंगी लढतीचे चित्र होते. येथे माजी आमदार शरद गावीत यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरल्याने निवडणुकीत चुरस होणार असल्याचे चित्र होते. माघारीनंतरही ते चित्र सर्वाधिक १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असले तरी खरी लढत काँग्रेसचे शिरीष नाईक, अजित पवार गटाचे भरत गावीत व अपक्ष शरद गावीत यांच्यातच होणार आहे.

## दारूच्या गुन्ह्यांमध्ये दीड वर्षापासून फरार संशयिताला पोलिसांकडून अटक

### नवापूर पोलिसांची कारवाई

नंदुरबार : नवापूर पोलिस ठाण्याच्या पथकाने विविध गुन्ह्यांत दीड वर्षापासून फरार असलेल्या संशयिताला ताब्यात घेतले. सोमवारी नवापुरात देवळफळी भागात ही कारवाई करण्यात आली. पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी फरार आरोपींना पकडण्यासाठी सर्व पोलिस ठाणी व स्थानिक गुन्हे शाखेचे स्वतंत्र पथक स्थापन करून विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना केल्या होत्या. यानुसार, एप्रिल २०२३ मध्ये नवापूर पोलिस ठाण्यांतर्गत दारूबंदी व इतर कायद्यान्वये दाखल

गुन्ह्यातील संशयित गोरख उर्फ पिंटू भीमराव गढरी (बडोगे) रा. देवळफळी ता. नवापूर हा दीड वर्षापासून फरार होता. दाखल गुन्ह्यात ८९ लाख २ हजार ४९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत झाला होता.

दरम्यान, सोमवारी फरार संशयित पिंटू गढरी हा नवापुरात आल्याची माहिती मिळाल्यानंतर, पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत व त्यांच्या पथकाने देवळफळी भागातून त्याला ताब्यात घेतले. ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलिस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय त्याच्याविरोधात नवापूरसह गुजरात राज्यात अवैध दारू वाहतुकीचे तब्बल २७ गुन्हे दाखल आहेत.

महाजन यांचे मार्गदर्शनात नवापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत, पोलिस उपनिरीक्षक विशाल सोनवणे, जितेंद्र महाजन, पोलिस हवालदार दिनेशकुमार वसुले, दादाभाऊ वाघ, नितीन नाईक पोलिस अंमलदार परमानंद सोनवणे, दिनेश बाविस्कर, समाधान केंद्रे दीपक पाटील, रमेश पावरा यांनी केली.

## प्लायवूडच्या गोदामाला भीषण आग, पाच दुकाने जळून खाक; लाखो रुपयांचे नुकसान

नंदुरबार : शहरातील रेल्वे फाटक परिसरातील प्लायवूडचे गोदाम आणि दुकानांना आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले. रविवारी रात्री लागलेली ही भीषण आग अग्निशमन विभागाने तब्बल तीन तासांच्या मेहनतीनंतर पहाटे आटोक्यात आणली. दरम्यान सोमवारी सकाळीही गोदाम धुमसत असल्याचे दिसून आले.

उड्डाणपुलाखालील ग्यारा मिल कंपाऊंड समोर साईबाबा मंदिराजवळ विविध दुकाने आणि गोदाम आहेत. याठिकाणी एका गोदामात प्लॉयवूडचे साहित्य तर लगतच्या दुकानात टायर ठेवलेले आहेत. रविवारी रात्री एका गोदामातून धूर निघत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले होते. ही माहिती मिळाल्यानंतर याठिकाणी बघ्यांची एकच गर्दी झाली होती. गोदाम आणि दुकानांमध्ये ज्वलनशील पदार्थ असल्याने अवघ्या काही मिनिटात आग पसरली होती. यादरम्यान टायरच्या गोदामातील कॉम्प्रेसर फुटल्याने मोठा स्फोट होऊन आगीचे लोळ



उड्डाणपुलापर्यंत गेले होते.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन बंब दाखल झाले होते. गोदामातील आग लगतच्या दुकानांमध्ये पसरुन नुकसान झाले.याठिकाणी गॅस वेल्डिंगसाठी लागणारे सिलिंडर भरून ठेवण्यात आले होते.

यातील सिलिंडर्सचा स्फोट झाला असता मोठा अनर्थ झाला असता, अशी

माहिती देण्यात येत आहे. दरम्यान आग आटोक्यात आल्यानंतर सोमवारी दिवसभर उपनगर पोलिस ठाण्यात नोंदीचे काम सुरू होते. व्यावसायिकांनी कागदपत्रे दिल्यानंतर नुकसानीचा आकडा समोर येणार आहे. आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

उपनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमितकुमार मनेळ यांनी पोलीस पथकासह रात्री घटनास्थळी भेट दिली होती. आगीची घटना पाहण्यासाठी रात्री उशिरापर्यंत नागरिक उड्डाणपुलावर थांबून होते.

## शिरपूर येथे टोल कर्मचाऱ्यांचे आंदोलन

### पोलिसांची मध्यस्थी : पगार व बोनस देण्याची मागणी

शिरपूर : पगाराच्या मागणीसाठी शिरपूर टोल नाक्यावर टोल कामगारांच्या विविध संघटनांनी ठिय्या आंदोलन केले. आंदोलनाची दखल घेत टोल प्रशासनातर्फे आंदोलकांशी चर्चा करून आठवडाभरात मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

शिरपूर टोल नाक्यावर विविध कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या वेगवेगळ्या संघटना आहेत. या संघटनांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी सकाळपासून ठिय्या आंदोलन केले. टोलनाक्याच्या अधिकाऱ्यांना आत प्रवेश करण्यापासून त्यांनी रोखले. परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात येतात शिरपूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पाटील व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आंदोलन करणाऱ्या कामगारांशी चर्चा केली. यावेळी कामगारांनी आपल्या व्यथा मांडल्या. टोल नाक्यावर कंत्राटी भरतीने कामगार



नेमले जातात. कंत्राटदार त्यांच्या कामाचे २६ दिवस पूर्ण न होऊ देता केवळ १८ दिवसच काम करून घेतो. त्यामुळे त्यांचा पगार कमी भरतो. अत्यल्प पगार मिळत असल्यामुळे कर्मचाऱ्यांची उपासमार होत आहे.

दिवाळी तोंडावर आली तरी कंत्राटदार बोनस देण्याचे नाव घेत नाही. त्याच्याकडून कामगारांचे शोषण सुरू आहे, असा आरोप कामगारांनी केला. पोलिसांनी मध्यस्थी करून टोल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी

दूरध्वनीवरून संवाद साधला. यावेळी येत्या आठवडाभरात टोलनाक्यावरील विविध कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी ते चर्चा करणार असून लवकरच योग्य मार्ग काढला जाईल, असे सांगितले. त्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

## राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मांची नियुक्ती

मुंबई-केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली केली होती. काँग्रेस नेते नाना पटोलेंसह विरोधकांकडून रश्मी शुक्ला यांची निवडणुकीपूर्वी बदली करावी, अशी मागणी करण्यात आली होती. या मागणीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने सकारात्मक प्रतिसाद देत रश्मी शुक्ला यांची राज्याच्या पोलीस महासंचालक पदावरुन बदली करण्यात आली होती. यानंतर राज्याच्या पोलीस महासंचालकपदी कोणाची वर्णी लागणार याची सातत्याने चर्चा रंगली होती. अखेर राज्याच्या पोलीस महासंचालकपदी वरिष्ठ पोलीस अधिकारी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रश्मी शुक्लांच्या बदलीनंतर राज्याच्या मुख्य सचिवांनी नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे निवडणूक आयोगाकडे पाठवण्याचे निर्देश दिले होते. यात मुंबईचे पोलीस आयुक्त



विवेक फणसळकर, पोलीस सेवेतले वरिष्ठ अधिकारी संजय वर्मा आणि रितेश कुमार या तीन नावांचा समावेश होता. अखेर आज वरिष्ठ पोलीस अधिकारी संजय वर्मा यांची राज्याच्या पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**संजय वर्मा यांचा अल्पपरिचय**

संजय वर्मा १९९० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. सध्या ते महाराष्ट्रात कायदा आणि तंत्रज्ञान विभागाचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. राज्याच्या पोलीस महासंचालकपदासाठी संजय वर्मा यांचे नाव आघाडीवर होते. एप्रिल २०२८ मध्ये ते पोलीस सेवेतून निवृत्त होतील

**रश्मी शुक्लांवर आरोप काय होते?**

रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधकांचे फोन टॅप केल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे त्या वारंवार वादात अडकल्या होत्या. याआधी, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा फोन टॅप केल्या प्रकरणी आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला या चर्चेत आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी रश्मी शुक्ला अवैध पद्धतीने फोन टॅपिंग करत असल्याचा आरोप केला होता. नवाब मलिक यांनी शुक्ला या भाजपच्या एजंट असल्यासारखं काम करतात, असा आरोप केला होता. रश्मी शुक्ला या देवेंद्र फडणवीसांच्या खूप जवळच्या अधिकारी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सतत होत असते.

रश्मी शुक्लांच्या बदलीनंतर मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्या पोलीस महासंचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. यानंतर आता राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## चोपडा तालुक्यातील वेळोदे येथील पोलीस दलातील अधिकारी श्री.उमेश बोरसे यांचे 'भारत सरकारच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक' बहाल व गुणवत्तापुर्वक तपास अधिकारी म्हणून सन्मानित

चोपडा ( प्रतिनिधी)-नाशिक ग्रामीण पोलीस दलातील येवला शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कर्तव्यदक्ष अधिकारी श्री. उमेशजी बोरसे यांनी तत्कालीन प्रभारी अधिकारी म्हणून थाळनेर ता.शिरपुर पोलीस स्टेशन हद्दीतील तरडी येथील खुनाच्या गुन्ह्यात घटनास्थळी कुठलाही ठोस पुरावा नसतांना सदर गुन्ह्याचा तपास करून गुन्हा उघडकीस आणला होता. सर्व सबळ पुरावे गोळा करून गुन्ह्यातील आरोपींना जेरबंद केले होते. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची शासनाने दखल घेऊन त्यांना भारत सरकारच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक बहाल केले असून गुणवत्तापूर्वक तपास अधिकारी म्हणून सन्मानित केले आहे. या पुरस्काराचे वैशिष्ट्ये म्हणजे संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून फक्त ११ अधिकाऱ्यांची निवड केली जाते. यात श्री. बोरसे हे मूळ रहिवासी चोपडा तालुक्याचे वेळोदे येथील आहेत यांची निवड झाल्याने संपुर्ण खानदेशवाशीयांचा गौरव झाला आहे. त्यांनी थाळनेर पोलीस स्टेशन हद्दीत तीन खुनाच्या गुन्ह्यांचा कसोसीने तपास करून खुनाच्या गुन्ह्यांतील आरोपी निष्पन्न केले होते. पोलिस दलातील अत्यंत चाणाक्ष, हुशार, न्याय अन् शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ते परिचित आहेत.थाळनेर येथे कार्यरत महाराष्ट्र गुन्ह्यांचा घटनास्थळी ठोस पुरावा नसतांना आपल्या बुद्धी कौशल्याने यशस्वी तपास करून आरोपींना जेरबंद केले. पोलिस स्टेशन हद्दीत त्यांनी माणुसकी जपत अनेक जनहिताची कामे केली. विद्यार्थी, खेळाडू, परिक्षार्थीना गावोगावी मार्गदर्शन शिबीरे घेतली. मजुर, कामगार, शेतकरी, कष्टकरी यांना सर्वतोपरी मदत केली. अनेकवेळा त्यांनी स्वतः पदरमोड करून लोकहित साधले आहे. जनतेचे कायदेशीर प्रश्न मार्गी लावले. श्री. बोरसे म्हणजे माणसं खेचुन घेणारे चुंबकच असे म्हटले तरी वावगे ठरू नये. त्यांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक उपक्रम राबविले. ते उच्चशिक्षित असुन आश्वासक नेतृत्व आहे. तर सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व आणि तितकाच नम्र स्वभावामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व



खुलुन दिसते. त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू आहेत थाळनेर नंतर आझाद नगर (धुळे) आणि आता येवला शहर येथे त्यांनी आपल्या प्रामाणिक कर्तव्याची छाप सोडली आहे. त्यांच्या कामात नेहमीच निष्पक्ष भावना दिसून येते. सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर मार्गाने सतत त्यांचे प्रामाणिक प्रयत्न चाललेले असतात. पदाचा कुठलाही लवलेश न ठेवता सामान्य माणसाची समस्या ऐकून घेऊन ती आपल्या पद्धतीने कशी सोडवता येईल यासाठी त्यांची नेहमीच कसरत चाललेली असते. त्यांनी नेहमीच आपल्या कर्मावर विश्वास ठेवला असून कधीही फळाची अपेक्षा केली नाही. आणि परमेश्वराने देखील त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना नेहमीच न्याय दिला आहे. त्यांना भारत सरकारच्या वतीने पुरस्काराने सन्मानित केल्याने त्यांच्या उल्लेखनीय कार्याची पावतीच मिळाली आहे. प्रत्येकांच्या सुख दुःखात सहभागी होणारा जनतेच्या ह्रदयावर राज्य करणारा अधिकारी ज्या माणसाने आयुष्यात नेहमीच पैसा पेक्षा माणसालाच अधिक किंमत दिली. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न केलेत. बोरसेनी नेहमीच मार्गदर्शन करणारे धुळे जिल्ह्यात कार्यरत असताना सपोनि उमेश बोरसे यांना मा. पोलीस अधीक्षक सो, श्री. श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, श्री. किशोर काळे, मा. सेवानिवृत्त पोनि. अन्साराम आगरकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. उमेश बोरसे यांचे संपुर्ण महाराष्ट्रातुन अभिनंदन होत आहे

# ब्रह्माकुमारी विश्व विद्यालयात मतदान जागरुकता अभियान



जळगावः लोकशाहीचा उत्सव म्हणून निवडणुकांकडे पाहिले जाते.

लोकशाहीत प्रत्येक नागरीकाने मतदान केले पाहिजे यासाठी शासन, प्रशासन प्रयत्न करीत आहेत त्याचबरोबर अशासकीय व सामाजिक संस्थाही कार्य करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्व विद्यालयाच्या स्थानिक ढाके कॉलनी सेवाकेंद्रात मतदान जागरूकता अभीयानाचे आयोजन करण्यात आले.

ब्रह्माकुमारी मिनाक्षीदीदीजी यांनी याप्रसंगी लोकशाहीत मतदानाचे महत्व सर्वांना सांगितले. या अभियानासाठी मा. आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी जळगाव यांनी जिल्हा आयकॉन म्हणून नियुक्त केलेल्या मदन लाठी यांनी उपस्थितांना मतदान करण्याचे आवाहन करुन शपथ दिली. ब्रह्माकुमारीज माऊंट आबू आब आणि संपूर्ण भारतात ब्रह्माकुमारीज सदस्य हे मतदानात उत्साहाने सहभागी होतात असे प्रतिपादन याप्रंसगी ब्रह्माकुमारीज् जनसंपर्क अधिकारी डॉ. सोमनाथ वडनेरे यांनी केले. याप्रसंगी ब्रह्माकुमारी बहिणींनी मतदान जागृतीसाठी विशेष रांगोळी काढून एलोशन केले

# जामनेरातून १२ उमेदवारांची माघार लढतीसाठी १० उमेदवार रिंगणात

जामनेर (प्रतिनीधी) जामनेर विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याच्या शेवटच्या तारखेला एकूण बारा उमेदवारांनी आपले सर्व नामनिर्देशन पत्र माघार घेतल्यामुळे आता दहा उमेदवार रिंगणात आहेत . नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर आज नाम निर्देशन पत्र माघारीच्या मुदतीचा शेवटचा दिवस होता विहित अंतिम वेळेपर्यंत आत्माराम सुरसिंग जाधव ज्ञानेश्वर गोपीचंद चव्हाण जितेंद्र पांडुरंग पाटील जितेंद्र श्रावण पाटील दीपकसिंह शांतीलाल राजपूत दिलीप शांताराम खोडके नितीन स्वरूपचं नाईक परवेज आलम अब्दुल रशीद पुना पुंडलिक शेळके प्रशांत भीमराव पाटील मोहम्मद समीर युनूस खान हुसेन युसुफ तडवी या बारा उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र मागे घेतले नामनिर्देशन पत्र माघारीच्या मुदतीच्या नंतर आता दहा उमेदवार रिंगणात असून त्यांना निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार व उमेदवाराच्या पसंती क्रमानुसार चिन्ह वाटप करण्यात आले दिलीप बळीराम खोडपे यांना तुतारी वाजवणारा माणूस गिरीश दत्तात्रय महाजन यांना कमळ विशाल हरिभाऊ मोरे यांना हत्ती अण्णासाहेब रामचंद्र राठोड यांना ऑटो रिक्षा प्रभाकर पंढरी साळवे यांना शिट्टी मदन भाऊ शंकर चव्हाण यांना डोली अनिल अनिल रंगनाथ पाटील गन्ना किसान दिलीप मोतीराम खामनकर ट्रंपेट राजेंद्र सुभाष खरे ट्रक राहुल राय अशोक मुळे गॅस सिलेंडर या चिन्हांचे वाटप करण्यात आले यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नानासाहेब आगळे नायब तहसीलदार दराडे मॅडम आदि अधिकारी उपस्थित होते.

# आदिवासी पाड्यावर कपडे, शैक्षणिक साहित्यासह फराळ वाटप



भुसावळ : येथील श्री गुरूदेव ज्येष्ठ नागरिक मंडळा मार्फत श्री क्षेत्र डोंगरदे येथील आदिवासी पाड्यावरील ३०० कुटुंबीयांना घरोघरी जाऊन कपडे, शैक्षणिक साहित्य व दिवाळीनिमित्त फराळ वाटप करण्यात आले. प्रारंभी मंडळाच्या सभासदांनी डोंगरदे येथील पंत मंदिरात जाऊन श्री गुरूदेव दत्तांचे दर्शन घेतले. तसेच आदिवासी लोकांना पोटभर अन्न, अंगभर कपडे, निवारा आणि चांगले शिक्षण मिळावे, यासाठी प्रार्थना करण्यात आली. या उपक्रमासाठी मंडळाच्या सदस्यांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले. या उपक्रमास मंडळाचे अध्यक्ष प्रकाश विसपुते, सचिव बी. डी. चौधरी, कोषाध्यक्ष रमाकांत पाटील, नारायण पाटील, मामा पाचपांडे, डी. डी. जावळे, विकास कात्यायनी, रमेश बिऱ्हाडे सोनार, चंद्रकांत भालेराव, एस. एस. कुरकुरे, रामदास ढाके, अनिल नारखेडे, जयश्री विसपुते, मंगला येवले, सुनीता पाटील, जयश्री ढाके आदी सभासदांनी सहकार्य केले. ऐन दिवाळीत गोडधोड पदार्थ आणि चटकदार फरसाण खायला मिळाल्याने लहान मुलांसह महिला, पुरुषांच्या चेहऱ्यावर या वेळी आनंद झळकत असल्याचे दिसून आले.

# राज्यातील २८८ मतदारसंघात ४ हजार १४० उमेदवार निवडणूक रिंगणात!

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील २८८ मतदारसंघात २९३८ उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर अंतिमत: ४ हजार १४० उमेदवार रिंगणात राहिले आहेत. २० तारखेला त्यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. पंधराव्या विधानसभेसाठी आठ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यातील ७ हजार ७८ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरले होते.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत सोमवारी ३ वाजता संपली. त्यातील २९३८ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे अंतिमत: ४ हजार १४० उमेदवार निवडणूक रिंगणात राहिले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. सर्वाधिक ३४ उमेदवार बीड जिल्ह्यातील माजलगाव मतदारसंघात आहे तर नंदुरबार जिल्ह्यातील शहादा मतदारसंघात केवळ ३ उमेदवार आहेत.नांदेड उत्तर मतदारसंघात ३३, बीड मतदारसंघात ३१ उमेदवार रिंगणात आहेत. महाड व कुडाळ मतदारसंघात ५ तर बोईसर व धुळे जिल्ह्यातील शिरपूर मतदारसंघात ६ उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातील ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार २० नोव्हेंबर रोजी त्यांच्या भवितव्याचा फैसला करणार आहेत.

**सर्वाधिक मतदार पुणे जिल्ह्यात!–** विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक !

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत.

गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख ५ हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत. बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

# जळगाव रेल्वे स्टेशनवर मतदान जनजागृती




जळगावः मतदानाचा टक्का वाढावा यासाठी जळगाव जिल्ह्यात शासकीय, सामाजिक सेवा भावी संस्थेन मार्फत आणि विविध संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे.

गांधी रिसर्च फाउंडेशन चे सहकारी आणि जळगाव जिल्हा विधानसभा २०२४ चे आयकॉन मदन रामनाथ लाठी यांनी मतदानाचे महत्त्व थोडक्यात पटवून दिले आणि २० नोव्हेंबर रोजी पहिल्या टप्प्यात जास्तीत जास्त

मतदान करुन सोबत घरातील, आजुबाजुचे, नातेवाईकांना विनंती करून जसे आपण उत्सव साजरे करतो त्या प्रमाणे २० नोव्हेंबर हा साजरा करावा हि विनंती केली आणि सोबत शपथ सर्व सदस्यांनी घेतली.

यावेळी जळगाव रेल्वे स्टेशनचे व्यवस्थापक कौस्तुभ चौधरी, धर्मवीर ( आरोग्य विभाग, जळगाव रेल्वे स्टेशन), ज्ञानेश्वर पाटील, मोहित कुमार व रोटरी क्लबचे मान्यवर रेल्वे चे कर्मचारी उपस्थित होते.

# पाचोऱ्यातुन ४० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल लांबविली

पाचोरा-पाचोरा शहरातील दामजी नगर येथुन अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची पल्सर मोटरसायकल चोरुन नेली आहे. मोटरसायकलचा सर्वत्र शोध घेतला असता मिळुन न आल्याने पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



याबाबत पोलिसांकडून प्राप्त माहिती अशी की, प्रमोद अशोक जगताप रा. दामजी नगर, पाचोरा यांची ४० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल क्रं. एम. एच. १९ डी. डब्ल्यु. ९१६० ही ३१ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजेपासून ते १ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान राहत्या घराजवळुन अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे.

सदर मोटरसायकलचा सर्वत्र शोध घेतला असता मिळुन न आल्याने प्रमोद जगताप यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मोटरसायकलचा व चोरट्याचा शोध पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल विश्वास देशमुख हे घेत आहेत.

# दगडी शिवारात केळीचे घड कापुन शेतकऱ्यांचे नुकसान तात्काळ बंदोबस्त करण्याची शेतकऱ्यांची मागणी

चोपडा – मनवेल ता. यावल तालुक्यातील दगडी शिवारात दोन एकर क्षेत्रातील सुमारे पाच हजार रुपये किमतीचे २० केळीचे घड कापून नुकसान केल्याची घटना घडली. मात्र संबंधित शेतमालकाच्या सतर्कतेमुळे हे घड चोरून नेण्याचा चोरट्यांचा प्रयन्त फसला. पोलिसांनी चोरट्यांचा शोध घेऊन बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

याबाबत वृत्त असे की, मनवेल येथील बाळकृष्ण मोहन पाटील यांनी दगडी गावाच्या रस्त्यालगत असलेल्या शेतात दोन एकर क्षेत्रात केळीची लागवड केली आहे. त्यांच्या केळीचे घड तयार झाले असून एक दिवसांपूर्वीच एका व्यापाऱ्याशी माल विक्रीचा व्यवहार झाला होता. शुक्रवारवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास बाळकृष्ण पाटील हे शेतातून केळी कापुन घरी आले.

शनिवारी शनिवारी सकाळी ७ वाजता वीजपुरवठा सुरू होतो म्हणून पिकांना पाणी देण्यासाठी ते परत



शेतात आले. पाटील हे सात वाजेच्या सुमारास लाईट व मोटार सुरू करून पिकांना पाणी देत होते. त्यावेळी त्यांनी झाडांवरील केळीचे घड कापल्याचे निदर्शनास आले. शेतातून रस्त्यार्पयत सुमारे २० पेक्षा जास्त केळीचे घड कापून ठेवलेले होते. सध्या केळीला पंधराशे रुपयांचा भाव असल्याने सुमारे एक लाख रुपये किमतीचा हा माल होता.एक-दीड तासातच वीस केळीचे घड कापून शेतातच व्यवस्थित ठेवण्यात आलेले होते. त्यावरून हे चोर दोन-तीन, जण असण्याची शक्यता आहे. चोरांनी पद्धतशीरपणे नियोजन केले होते. हे केळीचे घड वाहून नेण्यासाठी वाहनही आणले असावे, असा अंदाज आहे. यावल तालुक्यात शेतातून शेती साहित्याची चोरी व तयार झालेला शेतमाल चोरून नेण्याच्या घटना ह्या कायमच्या झाल्या आहेत.

# अखेर निर्माणीतील उर्वरित दोन रायफली हस्तगत

## चोरट्यावर एटीएस पथक व स्थानिक पोलिसांची झडप : तळवेल गावातून दोन रायफलीसह तिघे ताब्यात

वरणगाव- वरणगाव आयुध निर्माणीतून मागील महिन्यात शास्त्रगाराचा कडीकोयंडा तोडून दोन गलील व तीन एके ४७ अशा पाच रायफली चोरीला गेलेल्या होत्या. त्यातील तीन रायफली मागील आठवड्यात जाडगाव जवळ रेल्वे रुळावर सापडल्या होत्या, तर दोन रायफलींचा शोध चालू होता. दरम्यान सोमवारच्या भल्या पाहटे एटी एसपथक व स्थानिक पोलीसांना याचा सुगावा लागला. तळवेल गावातून चोराच्या घरात झडप घालून दोन रायफलींसह तिघांना ताब्यात घेतले.

आयुध निर्माणीतील फ्रुप टेस्टींग विभागाच्या शस्त्रागाराचा कडीकोयंडा तोडून तीन एके ४७ व दोन गलील रायफली चोरी झाल्याचे दि २३ ऑक्टोबर रोजी वरणगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरुवातीला या गुन्हाचा तपास सह निरीक्षक जर्नाधन खंडेराव यांच्याकडे होता. तो दोनच दिवसांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. सोबतच या गुन्ह्याचा तपास लावण्यासाठी क्रॉमाई ब्रँच, मुंबई येथून ए. टी. एस पथक असे चार पथके दि २३ ऑक्टोबर पासून शहरात ठाण मांडून बसलेले होते.

दरम्यान दि २९ ऑक्टोबर रोजी वरणगाव पासून थोड्याच अंतरावर असलेल्या जाडगावाजवळ रेल्वे खंबा नं ४५४/१५/१६ मध्ये दोन एके ४७ व एक गलील अश्या तीन रायफली बेवारस स्थितीत चाबीवाल्यास आढळल्या होत्या. तर दोन रायफलीचा पोलीस कसून शोध घेत होते. दरम्यान निर्माणीच्या कर्मचाऱ्याची वरणगाव पोलीस स्टेशनला लगातार विभागाप्रमाणे चौकशी सत्र सुरू असल्याने आरोपीच्या मनात भीती निर्माण झाली. चोरास शोधण्यास सोपे होत गेले.



दरम्यान त्यातून अचुक चोरावर करडी नजर ठेवीत दि ४ सोमवारच्या भल्या पहाटे एटीएस पथक व स्थानिक पोलिसांनी तळवेल गाव गाठत संशीयत आरोपी निलेश थाटे याच्या घरात घुसले असता स्थानिक पोलीस व एटीएस पथक बघताच थाटेनी पोलीसांन समोर शरण येत चोरी केलेल्या घरातच गोणपाटात लपवून ठेवलेल्या एके ४७ व गलील रायफल आशा दोन रायफली काढून देत रेल्वे रुळावर रायफली टाकल्याची कबुली दिली. त्याला एटीएस पथकाने रायफलीसह स्थानिक गुन्हे पथकाच्या ताब्यात दिले आहे.